**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**रविवार, दिनांक : १५ सप्टेंबर, २०२४**

**ठळक बातम्या**

- **विद्यार्थ्यांनी केवळ सरकारी नोकरीत नव्हे तर तंत्रज्ञानामध्ये संधी शोधण्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं नागपुरात रामदेव बाबा विद्यापीठातील डिजिटल टॉवरच्या उद्घाटन प्रसंगी आवाहन.**

- **उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधल्या संविधान मंदिराचं लोकार्पण / राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा, तर संसद म्हणजे राज्यघटनेचा रक्षणकर्ता असल्याचं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन.**

- **नागपूरच्या विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VNIT) च्या 22 व्या दीक्षांत समारंभात 1225 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान; यांत्रिकी विभागाचे विद्यार्थी रोहित चौहान सर विश्वेश्वरय्या सुवर्ण पदकाने सन्मानित.**

- **सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे अभियंता दिनाच्या निमित्ताने राज्यस्तरीय उत्कृष्ट अभियंता पुरस्कार २०२३-२४ चे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते नागपूरात वितरण; उत्कृष्ट पूल म्हणून अंभोरा येथील वैनगंगा नदीवरील अत्याधुनिक पूल प्रकल्पास पुरस्कार.**

#####

**उपराष्ट्रपती डिजिटल टॉवर**

उपराष्ट्रपतीं जगदीप धनखड यांनी आज विद्यार्थ्यांना आवाहन केले की, केवळ सरकारी नोकऱ्यांमध्ये नव्हे तर तंत्रज्ञानातील संधीचा शोध घ्या. ते म्हणाले की, डिजिटल टॉवरसारख्या पायाभूत सुविधा अशा संधींचे प्रवेशद्वार आहेत. नागपुरातील रामदेव बाबा विद्यापीठात आज डिजिटल टॉवरचे उद्घाटन केल्यानंतर एका कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंजाबचे माजी राज्यपाल बनवारीलाल पुरोहित उपस्थित होते. 12 मजली डिजिटल टॉवरमध्ये संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या डिजिटल वर्गांचा समावेश आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, ब्लॉकचेन यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे महत्व विशद करताना उपराष्ट्रपतीं म्हणाले की ही विघटनकारी तंत्रज्ञान, आव्हाने आणि संधी दोन्ही आहेत आणि विद्यार्थ्यांना ही आव्हाने संधींमध्ये बदलायची आहेत. क्वांटम कॉम्प्युटिंग आणि ग्रीन हायड्रोजन मिशनसारखे तंत्रज्ञान गेम चेंजर ठरेल असेही ते म्हणाले. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की भारताला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी मानव संसाधनाची गरज आहे आणि अशी मानव संसाधने ही विद्यापीठ तयार करत आहेत. बनवारीलाल पुरोहित यांनी अभियांत्रिकेच्या तीन शाखा पासून सुरू झालेल्या रामदेव बाबा कॉलेजचा प्रवास आता विद्यापीठात झाला आहे या विद्यापीठातील विद्यार्थी भारताला विश्वगुरू बनवतील असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

यावेळी उपराष्ट्रपतींनी त्यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड यांच्यासमवेत विद्यापीठ परिसरात 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत वृक्षारोपण केले.मान्यवरांच्या हस्ते रामदेवबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहारही अर्पण करण्यात आले.

**संविधान मंदिर**

राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा, तर संसद म्हणजे राज्यघटनेचा रक्षणकर्ता आहे, राज्यघटना ही मिरवण्यासाठी नसून वाचून, समजून घेण्यासाठी आणि आदर करण्यासाठी आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिराचं लोकार्पण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातल्या कार्यक्रमात दूरदृश्य पद्धतीनं केल्यानंतर ते आज बोलत होते. राज्यघटनेची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानं ही मंदिरं उभारण्यात आली आहेत. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनी या संविधान मंदिराचं उद्घाटन करण्याचा हा क्षण अविस्मरणीय असून या मंदिरामुळे राज्यघटनेबद्दल जागृती वाढेल, राज्यघटना हे सुद्धा आपलं खरं मंदिर आहे, अशी ग्वाही धनखड यांनी दिली. राज्यघटनेबद्दल जाणून घेणं ही एक निरंतर प्रक्रिया आहे, असं ते म्हणाले. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात शिक्षण घेतलं आणि त्या शिक्षणाच्या जोरावर इतकं मोठं योगदान दिलं, त्या ठिकाणी हा कार्यक्रम होणं हे सौभाग्य असल्याचं ते म्हणाले राज्यघटनेनं दिलेल्या आरक्षणाला काही लोक विरोध करत आहेत, मात्र आरक्षण हा भारताचा, राज्यघटनेचा आत्मा आहे. आजच्या युवांनी राज्यघटनेचा अनादर करणाऱ्यांविरुद्ध लढण्याची तयारी ठेवावी, सर्वांनी स्वहिताच्या आधी देशहिताचा विचार करावा, असं आवाहन त्यांनी केलं. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे कौशल्यविकास, रोजगार, स्वयं उद्योजकता आणि नवनिर्मिती मंत्री मंगलप्रभात लोढा आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**पंतप्रधान झारखंड कार्यक्रम**

सबका साथ सबका विश्वास या मंत्रानं देशात विचारधारा आणि प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल केला असून गरीब, आदिवासी, दलित, वंचित, मागासवर्गीय, महिला, युवावर्ग आणि शेतकऱ्यांना प्राधान्य दिलं जात आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांनी आपल्या झारखंड दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात आज ६ वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्य्रक्रमात प्रधानमंत्र्यांनी ६६० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी आणि राष्ट्रार्पणही केलं. देशातल्या आदिवासी बंधुभगिनींसाठी ‘प्रधानमंत्री जनमन’ योजना राबवली जात असून या योजनेमार्फत अति मागास जमातीतल्या बांधवाना सहाय्य केलं जात आहे, असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांअंतर्गत बांधण्यात आलेल्या देशभरातल्या दोन कोटी नवीन घरांच्या वाटपाचा प्रारंभ आणि ४६ हजार लाभार्थ्यांच्या गृहप्रवेश सोहळा देखील या कार्यक्रमात पार पडला.

**अरविंद केजरीवाल**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी येत्या दोन दिवसांमध्ये मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार असल्याची घोषणा आज केली. दारू घोटाळा प्रकरणी केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयानं दोन दिवसापूर्वी जामीन मंजूर केला होता. त्यानंतर तिहार कारागृहातुन बाहेर आलेल्या केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या दोन दिवसांत आम आदमी पार्टीच्या सर्व आमदारांची बैठक घेऊन त्यात नव्या मुख्यमंत्र्याचं नाव निश्चित केलं जाईल, असं केजरीवाल म्हणाले आहेत. पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या दिल्लीच्या विधानसभा निवडणुका यंदा नोव्हेंबर महिन्यात घ्याव्यात अशी मागणी केजरीवाल यांनी केली आहे. अरविंद केजरीवाल यांची राजीनाम्याची घोषणा हा फक्त प्रसिद्धीसाठी असल्याची टीका भाजपाचे प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी केली आहे.

**व्हीएनआयटी दीक्षांत समारंभ**

आज “अभियांत्रिकी दिनाच्या” पर्वावर नागपूरच्या विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VNIT) येथे आयोजित 22 व्या भव्य दीक्षांत समारंभात 1 हजार 225 विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. या विशेष कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नीती आयोगाचे सदस्य डॉ. विजयकुमार सारस्वत होते. यावेळी व्हीएनआयटीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष मदन गोपाल आणि संचालक डॉ. प्रेमलाल पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख पाहुणे डॉ. सारस्वत यांनी आपल्या दीक्षांत भाषणात, वेगवान तंत्रज्ञानाच्या विकासाच्या पार्श्वभूमीवर संशोधनाचे महत्त्व, विविध तंत्रज्ञान आणि त्यांचा अवलंब यावर भर दिला. भविष्यात तंत्रज्ञानात निपुण अश्या अभियंत्यांची अतिशय महत्त्वाची भूमिका आहे. असे त्यांनी सांगितले. संचालक डॉ. प्रेमलाल पटेल यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला.

या दीक्षांत समारंभात 765 अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ टेक्नोलॉजी, 73 विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ आर्किटेक्चरची, 95 संशोधक छात्रांना, डॉक्टर ऑफ फिलोसोफी, 239 विद्यार्थ्यांना एम. टेक. , 60 विद्यार्थ्यांना एम एससी पदवी प्रदान करण्यात आली. याप्रसंगी यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचे विद्यार्थी रोहित चौहान, यांना बी. टेक. प्रोग्रामच्या सर्व विद्यार्थ्यांमधील उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीबद्दल 2024 चे प्रतिष्ठित "सर विश्वेश्वरय्या सुवर्ण पदक" देऊन सम्मानित करण्यात आले.

**राज्यस्तरीय उत्कृष्ट अभियंता पुरस्कार**

सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंते हे देशाच्या परमवैभवासाठी आवश्यक असलेली व्यवस्था उभे करत असतात. संपूर्ण देशाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर असते. त्यामुळे हा विभाग म्हणजे देश उभारणीसाठीची मोठी ताकद आहे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी नागपूरात केले. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे अभियंता दिनाच्या निमित्ताने राज्यस्तरीय उत्कृष्ट अभियंता पुरस्कार २०२३-२४ वितरण सोहळा आज सुरेश भट सभागृहात उतसाहात पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य करणारे अभियंते, वास्तुशास्त्रज्ञ, अतांत्रिक संवर्गातील कर्मचारी यांचा कुटुंबियांसह सत्कार करण्यात आला. यावेळी उत्कृष्ट प्रकल्प पुरस्कार वितरीत करण्यात आले. या प्रकल्पात उत्कृष्ट पूल - अंभोरा येथील वैनगंगा नदीवरील अत्याधुनिक पूल, उत्कृष्ट इमारत - पोरीबंदर येथील उत्पादन शुल्क विभाग मुख्यालय इमारत, उत्कृष्ट रस्ता - पुणे जिल्हयातील अष्टविनायक परिक्रमा मार्ग यांचा समावेश आहे.

आतापर्यंत राज्यस्तरीय अभियंता दिनाचा कार्यक्रम मुंबईत साजरा केला जात असे. पहिल्यांदाच तो विदर्भ-नागपुरात होत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांचे विदर्भावरील प्रेम व आदर दिसून येते, असे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप्पर मुख्य सचिव मनीषा पाटनकर-म्हैसकर यावेळी म्हणाल्या.

**रानटी हत्ती कळप**

मागील आठवड्यात गडचिरोलीच्या कुरखेडा तालुक्यात आलेल्या रानटी हत्तींच्या कळपाने आता आरमोरी तालुक्यात प्रवेश केला आहे. या हत्तींनी वैरागड परिसरातील धानपिकाचे नुकसान केले आहे. २८ रानटी हत्तींचा कळप कुरखेडा तालुक्यातून आरमोरी तालुक्यात आलेला आहे.

######